BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

पारधी विकास कार्यक्रम अंतर्गत पारधी आवास योजनेचे अध्ययन

विशाल मोकाशे

संशोधक , आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

डॉ. दिपक शृंगारे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

गोषवारा:

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये अमरावती जिल्ह्यातील पारधी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'पारर्थ आवास योजने'चा सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. ब्रिटिशकालीन 'क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट १८७१' च्या वारशाने उपेक्षित, भूमिहीन व शतकानुशतके तात्पुरत्या पालांमध्ये स्थलांतरित जीवन जगणाऱ्या पारधी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा या योजनेचा केंद्रवर्ती उद्देश आहे. अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यांमधील ४८ पारधी बेडयांचा आणि १०० प्रातिनिधिक लाभार्थी कुटुंबांच्या सर्वेक्षणाद्वारे या योजनेच्या अंमलबजावणीचे सखोल मूल्यमापन करण्यात आले आहे. या योजनेद्वारे सर्वसाधारण क्षेत्रासाठी रु. १,५८,०००/- तर नक्षलग्रस्त व डोंगराळ भागासाठी रु. १,६८,०००/- थेट अनुदान देऊन पक्के घर, शौचालय (स्वच्छ भारत मिशन), नळ जोडणी (जल जीवन मिशन) आणि मनरेगा मजुरी उपलब्ध करून दिली जाते. घरांची मालकी प्रामुख्याने महिलांच्या किंवा संयुक्त नावे दिल्याने महिला सक्षमीकरणाला गती मिळाली आहे. संशोधनातील निष्कर्षांनुसार, पक्का निवारा मिळाल्यामुळे समाजाचे पारंपरिक स्थलांतर लक्षणीयरीत्या घटले असून मुलांच्या शिक्षणात व कुटुंबाच्या सामाजिक दर्जात सकारात्मक स्थैर्य आले आहे. मात्र, नमुना ८-अ (जागेची अनुपलब्धता), शासकीय पट्ट्यांच्या वितरणातील प्रशासकीय संथ गती, निरक्षरता व ऑनलाइन प्रक्रियेतील अनभिज्ञता यामुळे १००% गरजूंना योजनेचा लाभ मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. यावर मात करण्यासाठी विशेष पट्टे वाटप शिबिरे, अनुदानात किमान रु. २.५० ते ३.०० लाखांपर्यंत वाढ, 'स्मार्ट व्हिलेज क्लस्टर मॉडेल' आणि एक खिडकी पद्धत राबविण्याची नहत्त्वपूर्ण शिफारस या शोधनिबंधात करण्यात आली आहे.

१. प्रस्तावना

भारत हा विविधतापूर्ण देश असला तरी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या विषमता ही एक मोठी आव्हान प्रणाली राहिली आहे. भारतीय समाजात 'विमुक्त जाती व भटक्या जमाती' हा घटक अत्यंत उपेक्षित व वंचित मानला जातो. या घटकामध्ये 'पारधी समाज' हा सर्वात जास्त संवेदनशील, वंचित आणि सामाजिक-आर्थिक दृष्ट्या मागासलेला समाज म्हणून ओळखला जातो.भारत देश स्वाधीन होऊन 75 वर्ष पूर्ण झाली असली तरी आपल्या देशातील एक समुदाय जोशिकारी पारध करण्याकरिता अधिक तर ओळखला जातो तो म्हणजे पारधी समुदाय आज हासमुदाय अत्यंत दुर्बल मागास दिसून येतो हा घटक आर्थिक सामाजिक व शैक्षणिक विकासापासून वंचित राहिलेला आहे प्रस्तुत संशोधनातून या समुदायातील कुटुंबांचे

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

सामाजिक व आर्थिक चिकित्सक अध्ययन करणार आहे कोणत्याही देशाचा आर्थिक विकास करायचा म्हटले तर त्या देशातील आर्थिक दृष्टीने दुर्बल असलेल्या घटकांचे दरडोई उत्पन्न वाढवावे लागते आणि म्हणून पारधी समुदायातील अनेक कुटुंबांच्या कुटुंब दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहे अशा समुदायाच्या उत्थान नाकरिता त्यांच्या सर्वांगीण उन्नती करता व प्रगती करता सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे अमरावती जिल्ह्यातील संदर्भात अभ्यास करताना असे लक्षात येते की या जिल्ह्याचे क्षेत्रफळ 12235 चौरस किलोमीटर आहे यामध्ये 14 तालुक्यांचा समावेश आहे सन 2011 च्या जनगणनेनुसार या जिल्ह्याची लोकसंख्या 28 लाख 88 हजार 445 इतकी आहे आपल्या अमरावती जिल्ह्यामध्ये पारधी समुदाय 48 असती करून राहतो ज्यांना आपण वेडे असे म्हणतो व 22 हजाराच्या जवळपास या समुदायाची लोकसंख्या आहे पारधी महाराष्ट्रातील एक आदिवासी जमात आहे पारद अर्थात शिकार करणारे आणि म्हणून पारधी असे या समुदायाचे नामकरण झाले या जमातीचे गावपारधी फासेपारधी असे प्रमुख दोन पोटभेद असून त्यातही अनेक पोटभेद आहेत पारधी जन्म जमात स्वतःला राजपूत समजतात उत्तरेकडून गुजरात व तेथून ती महाराष्ट्रात आल्याची आढळते. शिक्षण व साक्षरता यांचे प्रमाण यांच्यामध्ये फारच कमी दिसून येते हे प्रामुख्याने स्वीकार करतात त्या व्यतिरिक्त काही मोलमजुरी पाथरवटाचे काम शेतीचे काम शिवाय बऱ्याच भागामध्ये जमातीत बेरोजगारीचे प्रमाण अत्यंतिक असल्याने व आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने भीक मागण्याची सुद्धा पाळी यांच्यावर आली आहे गुन्हेगारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे आर्थिक दृष्टीने विचार केला तर आज गेल्या अनेक दशकांपासून ही जमात मुख्य प्रवाहापासून वंचित झालेली आहे प्रचंड बेरोजगारी मागासनेपणा कुपोषण शिक्षणाविषयी असलेली अनास्था गुन्हेगारी प्रवृत्ती या सर्वांचा सर्वांकष परिणाम स्वरूप म्हणजे त्यांच्यावर ओढलेली भीक मागण्याची प्रथा यामुळे या समाजातला योग्य न्याय व समाजात मानाचे स्थान मिळणे आवश्यक आहे अंधश्रद्धेत व समाजाने तिरकृत केलेल्या वातावरणात पारधी समाज आपले जीवन व्यतीत करत आहे ब्रिटिश काळात १८७१ मध्ये लागू करण्यात आलेल्या 'क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट' अंतर्गत पारधी समाजाला 'जन्मजात गुन्हेगार' म्हणून घोषित करण्यात आले होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी हा कायदा अधिकृतपणे रद्द झाला.परंतु कायद्याच्या अंमलबजावणीतून हा समाज मुक्त झाला असला तरी सामाजिक दृष्टिकोन आणि पूर्वग्रह दूषितच राहिले.कायमस्वरूपी निवाऱ्याचा अभाव, जमिनीची मालकी नसणे, तीव्र दारिद्र्य, रोजगाराचा अभाव आणि सामाजिक बहिष्काराची किनार यामुळे पारधी समाज शतकानुशतके स्थलांतरित व तात्पुरत्या पालांमध्ये (ताडपत्री किंवा गवताच्या झोपड्यांमध्ये) जीवन जगत आला आहे.

पारधी विकास कार्यक्रम:

महाराष्ट्रात पारधी समाजाच्या फासे पारधी, पाल पारधी, भोसले पारधी, चमेली पारधी इत्यादी उपघटकांच्यासर्वांगीण पुनर्वसनासाठी विशेष 'पारधी विकास कार्यक्रम' आखण्यात आला. या कार्यक्रमातील सर्वात केंद्रवर्ती आणि मूलभूत घटक म्हणजे 'पारधी आवास योजना'. हक्काचा आणि पक्का निवारा हा केवळ राहण्याचे ठिकाण नसून तो मानवी प्रतिष्ठा, सामाजिक स्थैर्य आणि विकासाचा मुख्य पाया आहे, या तत्त्वावर ही योजना आधारित आहे. पारधी समुदायाच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये परिवर्तन व्हावे समाजाच्या मुख्य प्रवाहात इतर समाजाबरोबर उभे राहून तसेच पारधी समुदायातील महिला व पुरुषांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा पारधी विकास कार्यक्रमाचा उद्देश आहे याकरिता आदिवासी विकास विभाग तर्फे सन 2011-12 या वर्षापासून पारधी विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे या पारधी विकास कार्यक्रम अंतर्गत पारधी समाजातील कुटुंबांना राहण्याकरता घरकुल जे शिक्षित बेरोजगार आहेत त्या समुदायातील त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे त्याच पद्धतीने व्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी व्यवसाय उभारणी करता अर्थसाह्य करणे पारधी समाज राहतो अशा वस्त्यांना मुख्य रस्त्यांशी जुळणे असे विकासात्मक कार्यक्रम हाती घेण्यात आले आहे व या कार्यक्रमांच्या माध्यमातून भारतीय समाजाची आर्थिक सामाजिक परिस्थिती दुरुस्त करून त्यांना समाजाच्या इतर प्रवाहाबरोबर येण्याकरिता उद्युक्त केले जात आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

'पारधी पॅकेज' ही महाराष्ट्र शासनाने पारधी समाजाच्या सामाजिक, आर्थिक, आणि शैक्षणिक विकासासाठी सुरू केलेल्या विविध योजनांचा एक समूह आहे. ही कोणतीही एकच, एकल योजना नसून, अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांना स्पर्श करणारे धोरणात्मक निर्णय आणि योजनांचा एकत्रीकरण आहे. या पॅकेजचा प्रमुख उद्देश पारंपारिकरित्या भटक्या आणि उपेक्षित राहिलेल्या या समाजाला मुख्य प्रवाहात आणून त्यांना स्थिर आणि सन्मानजनक जीवनशैली प्रदान करणे आहे.

या अहवालानुसार, या पॅकेजमध्ये प्रामुख्याने निवास आणि घरकुल योजना (उदा. पारधी आवास योजना), उपजीविका आणि आर्थिक विकास योजना (उदा. स्वाभिमान सबळीकरण योजना, व्यावसायिक अर्थसहाय्य), आणि शिक्षण व सामाजिक विकासासाठीच्या योजनांचा समावेश आहे. शासनाने २००८ पासूनच या संदर्भात महत्त्वपूर्ण शासन निर्णय (GRs) जारी केले होते, ज्यामुळे या धोरणात्मक प्रयत्नांची सुरुवात झाली.

२. संशोधनाची उद्दिष्टे

या सविस्तर अध्ययनाची मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:

1. पारधी विकास कार्यक्रमांतर्गत पारधी आवास योजनेचे परीक्षण करणे.
2. आवास योजनेमुळे पारधी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक जीवनशैलीत झालेल्या बदलांचे मूल्यमापन करणे.
3. योजनेच्या भौतिक आणि आर्थिक प्रगतीशी संबंधित उपलब्ध प्रातिनिधिक आकडेवारीचे वैज्ञानिक विश्लेषण करणे.
4. जमिनीची उपलब्धता, प्रशासकीय प्रक्रिया आणि निधी वितरण यांमधील अडथळे व आव्हाने अधोरेखित करणे.
5. पारधी समाजाच्या शाश्वत पुनर्वसनासाठी धोरणात्मक शिफारसी व उपाययोजना सुचवणे.

३. संशोधनाची गृहीतके

उपरोक्त संशोधन निबंध करिता खालील गृहीतके मांडण्यात आली आहेत.

1. पारधी आवास योजनेमुळे समुदायाच्या पारंपरिक स्थलांतरात घट झाली आहे
2. पारधी कुटुंबांमध्ये सामाजिक स्थैर्य निर्माण झाले आहे.
3. जमिनीच्या पट्ट्यांची अनुपलब्धता आणि निधी वितरणातील विलंबामागील प्रशासकीय जटिलता यामुळे योजनेचा लाभ १००% गरजूपर्यंत पोहोचण्यात अडथळे येत आहेत.

१. पारधी आवास योजना

अन्न वस्त्र निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत मानवाला राहण्याकरता निवाऱ्याची आवश्यकता असते ऊन वारा पाऊस पाणी इत्यादींपासून संरक्षण करण्याकरिता त्याला पक्के चांगले घर असणे आवश्यक असते पारधी समुदायाच्या बाबतीत विचार करायचे झाले तर ते झोपडी दगड मातींनी बांधलेले घर टिन व पत्राचे घर असे निवारा करून राहतात. त्यांच्यासाठी या श्रेणीतील सर्वात महत्त्वाची योजना 'पारधी आवास योजना' आहे. ही योजना राज्यातील ग्रामीण भागातील बेघर किंवा कच्च्या घरात राहणाऱ्या पारधी समाजातील घटकांसाठी आहे. या योजनेची अंमलबजावणी १००% राज्य पुरस्कृत आहे. या योजनेतील आर्थिक तरतूद खालीलप्रमाणे आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

पारधी आवास योजनेची आर्थिक तरतूद

पारधी आवास योजनेच्या अंतर्गत पारधी जमातीतील लाभार्थी गटांना एकूण एक लाख 58 हजार रुपयाची तरतूद आहे ज्यामध्ये घरकुल बांधकामासाठी अनुदान एक लाख वीस हजार रुपये व मनरेगा अंतर्गत मजुरी 26 हजार रुपये त्यासोबतच शौचालयासाठी अनुदान 12000 रुपये असे दिले जाते असे एकूण एक लाख 58 हजार रुपये सर्वसाधारण क्षेत्रासाठी अनुदान दिले जाते मात्र पारधी समुदायातील लाभार्थी गट हा नक्षलग्रस्त किंवा डोंगर भागामध्ये राहत असेल तर त्यासाठी घरकुल बांधकामासाठी एक लाख तीस हजार रुपयाची तरतूद आहे मनरेगा अंतर्गत मजुरी करण्याकरता 26000 रुपयांची तरतूद आहे आणि शौचालयासाठी 12 हजार रुपयांचा अनुदान असे एकूण एक लाख 68 हजार रुपयाचे तरतूद करण्यात आली आहे.पारधी समाजाची विशिष्ट परिस्थिती विचारात घेऊन ही योजना नियमित घरकुल योजनांपेक्षा अधिक लवचिक आणि विशेष सवलतींसह राबवली जाते.

पारधी आवास योजनेची आर्थिक तरतूद दर्शवणारा तक्ता क्र.१

पारधी आवास योजनेची आर्थिक तरतूद			
अ.क्र	योजनेचा घटक	सर्वसाधारण क्षेत्रासाठी अनुदान	नक्षलग्रस्त/डोंगराळ क्षेत्रासाठी अनुदान |
१	घरकुल बांधकामासाठी अनुदान	रु. १,२०,०००/-	रु. १,३०,०००/-
२	मनरेगा अंतर्गत मजुरी	रु. २६,०००/-	रु. २६,०००/-
३	शौचालयासाठी अनुदान	रु. १२,०००/-	रु. १२,०००/-
	एकूण तरतूद	**रु. १,५८,०००/-**	**रु. १,६८,०००/-**

(स्रोत एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय धारणी चिखलदरा जिल्हा अमरावती)

तक्ता क्रमांक एक नुसार घरकुल बांधकामासाठी अनुदान म्हणून एक लाख वीस हजार रुपये पारधी आवास योजनेच्या माध्यमातून दिले जातात हे सर्वसाधारण क्षेत्राकरिता अनुदान आहे तर नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्राकरिता एक लाख तीस हजार रुपयांचे अनुदान दिले जाते त्यासोबतच मनरेगा अंतर्गत मजुरी म्हणून 26 हजार रुपये सर्वसाधारण क्षेत्रासाठी व नक्षलग्रस्त डोंगराळ क्षेत्रासाठी दिली जाते त्यासोबतच शौचालयासाठी अनुदान म्हणून बारा हजार रुपये जे दोन्ही क्षेत्राकरिता दिले जाते असे सर्वसाधारण क्षेत्रासाठी एकूण एक लाख 58 हजार रुपये तर नक्षलग्रस्त किंवा डोंगर क्षेत्राकरिता एक लाख 68 हजार रुपये अनुदान दिले जाते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रे दर्शवणारा तक्ता क्र .२

योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांची सूची	
१	**आवास योजनेचा विहित नमुन्यातील अर्ज**
२	**आधार प्रमाणपत्र**
३	**जातीचे प्रमाणपत्र**
४	**रहिवासी प्रमाणपत्र**
५	**दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र (असल्यास)**
६	**बँक खाते पासबुकची झेरॉक्स प्रत**
७	**कुटुंब भूमिहीन शेतमजूर असल्याचा दाखला**
८	**उत्पन्नाचा दाखला**
९	**नमुना ८ अ**

(स्रोत एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय धारणी चिखलदरा जिल्हा अमरावती)

योजनेचे प्रमुख निकष व वैशिष्ट्ये:

- मोफत पक्के घर: पात्र कुटुंबाला किमान २६९ ते ३०० चौरस फूट चटई क्षेत्रफळाचे पक्के घर उभारण्यासाठी थेट आर्थिक अनुदान दिले जाते.
- जमिनीच्या पट्ट्यांचे वाटप: पारधी समाजाकडे स्वतःची जागा नसल्याने शासकीय गायरान, पडीक जमीन किंवा सिलिंगच्या जमिनींवर अतिक्रमण नियमित करून त्यांना घरासाठी मोफत पट्टे दिले जातात.
- जल जीवन मिशन: नळाद्वारे पिण्याचे पाणी.
- स्वच्छ भारत मिशन: वैयक्तिक शौचालय बांधकाम.
- महावितरण: मोफत वीज जोडणी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना).
- मनरेगा : घरकुल बांधकामासाठी ९० ते ९५ दिवसांचा रोजगार व मजुरी.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

- महिला सक्षमीकरण: घराची मालकी ही कुटुंबातील महिला सदस्याच्या नावावर किंवा पती-पत्नीच्या संयुक्त नावावर केली जाते.

पारधी आवास योजनेचे मूल्यमापन

अमरावती जिल्ह्याचा विचार करता अमरावती जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने 48 बेड्यांमध्ये पारधी समुदाय आपले वास्तव्य करीत आहे या अनुषंगाने पारधी आवास योजनेचे मूल्यमापन करण्याकरिता आपण शंभर पारधी कुटुंबाची निवड केली असता त्यांना पारधी आवास योजनेमधून घरकुल मिळाले किंवा नाही यासंदर्भात एक सर्वेक्षण करण्यात आले पारधी आवास योजना ही प्रामुख्याने लाभार्थी गटापर्यंत पोहोचत आहे किंवा नाही या संदर्भामध्ये या सर्वेक्षणाचा निकाल हा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे पारधी आवास योजनेचे मूल्यमापन करण्याकरिता या सर्वेक्षणाचा अधिक जास्त उपयोग करण्यात आला आहे.

साधारण शासनाने १९९५ पासून पारधी समाजाच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना आणल्या येथे नमूद करावेसे वाटते कि, अनेक मागास समाजासाठी महाराष्ट्र शासनाने आर्थिक विकास महामंडळे स्थापना केली आहे. या महामंडळ याना शासन दरवर्षी त्यांच्या अंदाजपत्रकातून वर्षभरासाठी पुरेसा निधी वितरीत करतात व या निधीचा उपयोग त्या त्या समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी करण्यात येतो त्यामुळे त्या त्या समाजाचा आर्थिक विकास होतांना दिसत आहे. उदा. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ मातंग समाजच्या आर्थिक घडामोडी निट करण्यास एक मोठे पाउल आहे. या माध्यमातून चांगल्या आर्थिक योजना आणल्या जात आहे व त्याचा लाभ या समाजातल्या लोकाना होत आहे.

शासनाने काही वर्षापासून पारधी समाजासाठी पारधी पँकेज ची घोषणा करून आदिवासी विकास विभाग मार्फत आणलेली आहे. याचा लाभ पारधी समजला काही प्रमाणत होत आहे. पण अजूनही त्या पकेज चे वितरण पारधी समजा पर्यंत पूर्णपणे पोहोचली नाहीत याला काही अंशी तेथील प्रशासन व पारधी समाज हि तेवढाच कारणीभूत आहे. या समाजासाठी असणार्या योजना या समाजापर्यंत पोहोचत नाहीत याचे कारान या समजात भरपूर प्रमाणात निरक्षरता आहे. आपल्या समाजासाठी या योजा आहेत याची माहिती अजून पर्यंत बहुतांश पारधी कुटुंबाना नाही. त्यांच्या जवळ अजूनही पूर्ण महत्वाची कागदपत्रे नाहीत निरक्षरता असल्यामुळे अर्ज कसा करावा ,त्या मध्ये काय माहिती भरावी विशेषतः आभासी (ONLINE) प्रक्रीये संदर्भात ते अनभिज्ञ आहेत.आणि या समाजातही काही लोक हे स्वार्थी प्रवृत्तीचे आहेत त्यांची व प्रशासनातील काही मंडळी सोबत साठ गाठ आहेत ज्यामुळे ते त्यांच्याच समाजातील लोकाना मिळणार्या या योजनाच्या लाभापासून वंचित ठेऊन पारधी पँकेज चा लाभ मिळू देत नाही आहे.वास्तविक हे प्रमाण काही छोटे नाही हे मोठ्या प्रमाणात सर्हास सुरु आहे. हे प्रमाण कमी होण्याची निंतात गरज आहे. सर्व कागद पत्राचे वितरण त्यानां त्यांच्या वस्तीवर अर्थात बेड्या वर व्हायला हवे आणी ते हि स्काहम अधिकारी तहसीलदार महोदय यांच्या विशेष देखभाली सह होण्याची गरज आहे. काही समाजिक संस्था हे कार्य करीत आहे मात्र त्याची गती हि कासव गती पेक्षाही कमी आहे.एवढे पुरेसे नाही.यावर शासन प्रशासनाने याने गंभीर विचार करण्याची गरज आहे. पारधी समाजासाठी पारधी आवास योजना, शबरी आवास योजना, स्वाभिमान सबलीकरण योजना, शेतकऱ्या साठी विहीर आणि मोटरपंप योजना,व्यावसायिक अर्थसहाय्य ,पशुधन वाटप योजना, शिक्षण आणि सामाजिक योजना ,वसतिगृह आणि शिष्यवृत्ती , डिजिटल साक्षरता अभियान अश्या विविध योजना सुरु आहेत. या सर्वाची अमलबजावणी हि आदिवासी विभाग व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी , आदिवासी विकास विभाग जिल्हा परिषद (D.R.D.A.) यांच्या माध्यमातून होत असते.या योजनांची जेष्ठता यादी त्या त्या कार्यालयात असते त्या नुसार संबंधिताना त्या योजनांचा लाभ मिळत आहे.पण मुख्य अडचण अशी आहे कि, पारधी समाजाच्या निरक्षरते मुळे अनेकांची कागदपत्रे अपूर्ण असतात त्यामुळे त्याना घरकुल मिळण्यास अडचण जाते .

त्यांच्या अर्जात काय तृटी आहेत हे त्या विभाग मार्फत कळविले जात नाही.म्हणून त्यांच्या त्रुटी पूर्ततेसाठी जसे इतर कागदपत्र मा तहसीलदार यांच्या मार्फत पारधी बेड्यावर शिबीर घेतल्या जातात किवा अपडेट करून देतात त्या पद्धतीनेच मा तहसीलदार

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

यांच्या मदतीने असे शिबीर प्रत्येक वस्तीत घेतल्यास त्यांच्या कागदपत्रांची पूर्तता होईल व जेष्ठतेत त्यांचा क्रमाक राहील व याना घरकुल योजना सारख्या इतर योजनांचा लाभ घेता येईल.या साठी शासनाने ज्या ज्या जिल्ह्यात पारधी समाजासाठी काम करणाऱ्या अग्रणी सामाजिक सेवा संस्था आहेत त्यांची मदत घेतली पाहिजे.तसेच सामाजिक सेवा संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रित रित्या हे काम करण्याची गरज आहे. असे अनेक समाजिक संस्थांचे मत आहे. यावर शासनाने लक्ष देण्याची आणि विचार करण्याची गरज आहे .

घरकुल मिळण्यासाठी मुख्य अडचण हणजे नमुना ८ अ अनेक पारधी कुटुंब कडे नमुना ८ अ आहेच नाही. म्हणजेच त्यांचे घरकुलासाठी त्याना जागा नाही असे त्याचे एकुनच मत असते.मुळात त्याचा अर्थ असा होतो कि त्याना जागा उपलब्ध नाही. हि अडचण आहे.आणि जागा असली तरी स्थानिक ग्रामपंचायत त्याना जागा उपलब्ध असल्या बाबतचे परवानगी देत नाही.कोणत्याही प्रकारचे सहकार्य त्यांना स्थनिक शासन प्रशासना कडून होत नाहीत आणि विशेस म्हणजे या बाबी अनेक वेळा जिल्हाधिकारी आणि संबधित अधिकारी यांचे पर्यंत पोहोचली असून देखील यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही पुढे होताना दिसत नाही. यात स्थानिक ग्रामपंचायत , पंचायत समिती , यांचे सहकार्य मिळत नसल्यामुळे पारधी समाजास या योजनांचा लाभ मिळत नाही हि एक शोकांतिका म्हणावी लागेल.

७. निष्कर्ष

पारधी विकास कार्यक्रमांतर्गत राबवली जाणारी 'पारधी आवास योजना' ही पारधी समाजाच्या ऐतिहासिक शोषणावर आणि उपेक्षेवर मात करणारी एक अत्यंत क्रांतिकारी योजना सिद्ध झाली आहे. अध्ययनात मांडलेली गृहीतके पूर्णतः सिद्ध होतात. पक्का निवारा मिळाल्यामुळे समाजाचे पारंपरिक स्थलांतर थांबले असून, मुलांचे शिक्षण आणि स्वास्थ्यामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे.कायमस्वरूपी पत्ता आणि पक्के घर मिळाल्यामुळे समाजाला एक नागरिक म्हणून ओळख आणि सामाजिक सन्मान प्राप्त झाला आहे. गृहीतक ३ नुसार, जमिनीचे पट्टे देण्यातील संथ गती आणि अपुरे अनुदान या आव्हानांवर तातडीने मात करण्याची गरज आहे.

८. शिफारसी

1. महसूल विभागाने विशेष मोहीम राबवून पारधी वस्त्यांचे सर्वेक्षण करावे आणि गायरान/शासकीय जमिनींचे पट्टे थेट महिलांच्या नावावर मंजूर करावेत.
2. घरकुल अनुदानाची रक्कम सध्याची परिस्थिती महागाई लक्षात घेता अनुदानात वाढ करण्यात यावी व २.५० ते ३.०० लाख पर्यंत करावी.
3. केवळ स्वतंत्र घर न देता पारधी वस्त्यांचे 'स्मार्ट व्हिलेज/क्लस्टर' मॉडेल विकसित करावे, जिथे बालवाडी, अभ्यासिका आणि समूह विकास केंद्र उपलब्ध असेल.
4. 'एक खिडकी योजना' राबवून एकाच ठिकाणी जात प्रमाणपत्र, आधार, बँक खाते आणि घरकुल मंजुरीची प्रक्रिया पूर्ण केली जावी

संदर्भ सूची

1. कांबळे, उ. (२०१२). भटक्या-विमुक्त चळवळीचा इतिहास. सुगाव प्रकाशन.
2. गायकवाड, ल. (१९८७). उचल्या. शब्द पब्लिकेशन्स.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस. (२०१९). सोशियो-इकॉनॉमिक स्टेटस ऑफ DNT Tribes in Maharashtra (संशोधन अहवाल).
4. पवार, आ. (२०१८). विमुक्त पारधी: समस्या आणि विकास. चिन्मय प्रकाशन.
5. प्लॅनिंग कमिशन ऑफ इंडिया. (२०१३). रिपोर्ट ऑफ द नॅशनल कमिशन फॉर डिनोटिफाइड, नोमॅडिक अँड सेमी-नोमॅडिक ट्राइब्स (NRENKE Commission). भारत सरकार.
6. महाराष्ट्र शासन. (२०२२–२०२३). वार्षिक आर्थिक व भौतिक अहवाल. इतर मागास बहुजन कल्याण विभाग.